| | |
|---|---|
| | **दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२११/२०२६ मधील नि.क्र.०१ वरील आदेश**<br>(आदेश पारीत दिनांक – २९.०६.२०२६)<br>**भाग्यश्री वि. निरंक**<br>CNR No.MHLA060008052026 |

०१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने **बॉम्बे रेग्युलेशन अधिनियम–१८२७ चे कलम २** अन्वये वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळणेकरीता दाखल केला आहे.

०२. अर्जदाराचे संक्षिप्त कथन असे की, इसम नामे **चंद्रकांत पि. शिवाजी हेमनर** यांचा दिनांक ०३.०३.२०२६ रोजी मौजे बधलवाडी मावळ, पुणे येथे मृत्यू झाला आहे. (तद्नंतर **चंद्रकांत पि. शिवाजी हेमनर** यांना वाक्यांची पुनरावृत्ती टाळण्याच्या दृष्टीने 'मयत' असे संबोधण्यात येईल). अर्जदार भाग्यश्री ही मयताची आई आहे. अर्जदाराच्या व्यतिरीक्त मयताचे इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदाराने मयताच्या मृत्यू पश्चात त्यांच्या नावे असलेल्या स्थावर व जंगम मालमत्ता अर्जदार हिच्या नावे हस्तांतरण करणेकामी व इतरही कार्यालयीन कामकाजासाठी प्रस्तुतचा अर्ज वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सादर केला आहे.

०३. अर्जदाराच्या विनंतीस आक्षेप असल्याबाबत न्यायालयाच्या आदेशान्वये अर्जदाराने दिनांक २५.०५.२०२६ रोजी 'दैनिक रत्नापूर समाचार' वृत्तपत्रामध्ये जाहिर प्रगटन **(निशाणी १३)** प्रसिध्द केले होते. तसेच अहवाल निशाणी १० प्रमाणे जाहीरनामा मयताच्या घरावर ग्रामपंचायत कार्यालय नोटीस बोर्ड, तहसिल कार्यालय नोटीस बोर्ड, न्यायालयातील नोटीस बोर्ड यावर प्रसिध्द करण्यात आला. परंतु आजतागायत सदर प्रकरणामध्ये कोणाचाही आक्षेप/उजर प्राप्त झाले नाही.

०४. प्रस्तुत अर्जातील कथनांच्या पुष्टयर्थ अर्जदार हिने **(निशाणी १४)** अन्वये पुराव्याचे प्रतिज्ञापत्र सादर केले. सदर प्रतिज्ञापत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, तिने तिच्या प्रतिज्ञापत्रांत अर्जातील कथनांचा तंतोतंत समावेश केला आहे. कथनांची पुनरावृत्ती टाळण्याच्या हेतुने तिच्या प्रतिज्ञापत्रातील कथने याठिकाणी मांडण्याची आवश्यकता नाही. शिवाय अर्जदार हिने निबंधक (जन्म मृत्यू, विवाह नोंदणी), ग्रामपंचायत कार्यालय, नवलाख उंब्रे, ता.मावळ, जि.पुणे यांनी निर्गमित केलेले मयताचे मृत्यू प्रमाणपत्र **(निशाणी ०६)** व वारसाचे स्वंयघोषणापत्र **(निशाणी ०७)** वर दाखल केलेले आहेत.

मृत्यूप्रमाणपत्राचे अवलोकन केले असता, त्यामध्ये मयत यांचा दिनांक ०३.०३.२०२६ रोजी मौजे बधलवाडी मावळ, पुणे येथे मृत्यु झाल्याचे दिसून येते. तसेच ते धसवाडी, ता.अहमदपूर, जि.लातूर येथील रहिवासी असल्याचे दिसून येते. तसेच वारस स्वंयघोषणापत्राचे अवलोकन करता, उपरोक्त अर्जदार हे मयत यांचे वारस असल्याचे दिसून येते. तद्नंतर अर्जदाराने **(निशाणी १५)** अन्वये पुरसिस सादर करुन त्यांचा पुरावा बंद केला.

**०५.** अर्जदार हिच्या पुराव्यास कोणीही आव्हान दिलेले नाही. त्यामुळे अर्जातील कथनावर विश्वास ठेवण्यास हरकत नाही. अभिलेखाचे अवलोकन करता तसेच अद्याप कोणाचा आक्षेप नसल्यामुळे मयत यास केवळ अर्जदार हेच वारस असल्याचे ग्राह्य धरण्यास हरकत नाही. उपरोक्त विश्लेषणाअंती अर्जदाराचे मयताशी असलेले नातेसंबंध विचारात घेता, अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे, प्रस्तुत अर्ज मंजूर करणे योग्य व न्यायोचित आहे. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.
२. अर्जदार **भाग्यश्री भ्र. शिवाजी हेमणर** रा.धसवाडी, ता.अहमदपूर, जि.लातूर हे मयत **चंद्रकांत पि. शिवाजी हेमनर** रा.धसवाडी, ता.अहमदपूर, जि.लातूर यांचे वारस असल्याचे घोषित करण्यात येते.
३. दिवाणी पुस्तिका प्रकरण क्र.१४ मधील परिच्छेद क्रमांक ३१२ अन्वये मूळ वारस प्रमाणपत्रावर टिप नमूद करावी.
४. अर्जदाराने आवश्यक ते मुद्रांक शुल्क भरल्यानंतर वारस प्रमाणपत्र निर्गमित करावे.

(आदेश खुल्या न्यायालयात जाहिर).

Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2026.06.29 17:51:34 +0530

**स्थळ –** अहमदपूर.
**दिनांक –** २९.०६.२०२६.

**( स्वानंदी दे. वडगांवकर )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
अहमदपूर.